**मुद्रांक रु. ................/-**

**दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालय, नागपूर (शहर), जि. नागपूर**

**सन २०२६ बाजार मुल्यांकन विभाग ................,**

**खास मौजा -चिखली खुर्द, प.ह.नं. ३९-अ, तह. नागपूर, जि. नागपूर**

# : स्थावर मालाचे विक्रीपत्र :

**(बाजार भाव किंमत रु. ........................./-)**

**विक्रीपत्र किंमत रु. २५,००,०००/-**

**(अक्षरी रु. पंचवीस लाख फक्त)**

**विक्रीपत्र**
**लिहून घेणार :-** **श्री. भरत गुलाबराव चव्हाण**
वय ५३ वर्षे, धंदा - नौकरी
आधार नं. 2621 4641 2897
पॅन नं. AFEPC3156L

**विक्रीपत्र**
**लिहून देणार :-** **श्रीमती लक्ष्मी रामभाऊ वाघाड**
वय ६९ वर्षे, धंदा - गृहिणी
आधार नं. 4323 4642 2724
पॅन नं. AAJPW8474F
रा. प्लॉट नं. ३६३७, हनुमान मंदिर जवळ,
रामेश्वरी, नागपूर-४४००२७

ईसवीसन २०२६ सालकारणे विक्रीपत्राचा लेख लिहून देतो ऐसाजे की, माझ्या मालकी ताब्यातील स्वसंपादित स्थावर मालमत्ता तुम्हाला रु. २५,००,०००/- (अक्षरी रु. पंचवीस लाख फक्त) ला हमेशाकरीता नेहमीचे मालकी हक्काने विकली असून विक्रीची रक्कम खालील प्रमाणे मिळाली-

## ::मोबदल्याचा तपशील::

१) दि. १८/०४/२०२६ रोजी रूपये ५,००,०००/-

(अक्षरी रू. पाच लाख फक्त)

ही रक्कम नगदी/चेक द्वारे मिळाल्याचे कबूल व मंजूर आहे.

**उर्वरित रक्कम**

(अक्षरी रू. वीस लाख फक्त) रूपये २०,००,०००/-

वरील उर्वरित रक्कम रू. २०,००,०००/-(अक्षरी रू. वीस लाख फक्त) ही रक्कम आय.सी.आय.सी.आय. होम फायनान्स द्वारे घेण्याचे ठरलेले आहे.

**असे एकुण रु. २५,००,०००/- (अक्षरी रु. पंचवीस लाख फक्त)**

ह्या प्राप्त झालेल्या रक्कमेच्या मोबदल्यात तुम्हांस आमच्या मालकीचे व कब्जातील स्वसंपादित स्थावर मालमत्ता पूर्ण मालकी हक्काने नेहमीकरीता पूर्णतः आज आहे त्याच स्थितीमध्ये विकली असून ह्याा विकलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे आहे -

## -: स्थावर मालमत्तेचे वर्णन :-

नगपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगर पालिकेच्या सिमेअंतर्गत येणारा खास मौजा- चिखली खुर्द, प.ह.नं. ३९-अ, तह. नागपूर, जि. नागपूर येथील खसरा नं. ४४ मध्ये आखलेल्या अभिन्यासातील प्लॉट क्र. ७३, याची लांबी-रूंदी १/२(८.५०+१२. १९) x १०.७४ फुट असे याचे एकूण क्षेत्रफळ ११९५.९४ चौ.फुट (१११.११ चौ.मी) असून याचा शिट क्र. ५३७/४० व नगर भुमापन क्र. ६१ हा आहे.

**चर्तु:सीमा खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | रोड |
| पश्चिमेस | : | रोड |
| उत्तरेस | : | प्लॉट नं. ६० |
| दक्षिणेस | : | खुली जागा |

ह्या चर्तु:सिमेच्या आतील स्थावर मालमत्ता आज आहे त्याच स्थितीमध्ये तुम्हाला हमेशाकरीता नेहमीचे मालकीच्या हक्काने विकली असून तसा मालकी ताबा व अधिकार तुम्हाला आजपासून दिला आहे. आपण पाहिजे त्याप्रमाणे वहीवाट विल्हेवाट करावी वंशपरंपरेनी उपभोग फायदा घेत जावे.

वरील भूखंडकाच्या जागेबाबत कोणत्याही कोर्टात केस चालू नाही किवा कोणत्याही कोर्टाचा स्थगनादेश नाही. तसेच राज्य शासन, केंद्र शासन ह्यांच्या कोणत्याही प्रस्तावित योजनेमध्ये समाविष्ट नाही.

सदर्हु विकणार विक्रेता यानंतर सदर मालमत्तेसंबंधी कोणासही करार वा विक्रीचा व्यवहार करणार नाही व तसे काही झाल्यास त्याबद्दलची संपूर्ण नुकसान भरपाई विक्रेता खरेदीदार यांना व्याजासह करुन देईल. सदर्हु विक्रीपत्राचा लेख निर्दोष लिहीलेला असून यात कोणतीही चूक नाही. परंतु सदर्हु विक्रीपत्रामध्ये भविष्यामध्ये कोणतीही चूक आढळून आल्यास विक्रीपत्र हे खरेदीदार यांना आमच्या स्वखर्चाने कोणताही आक्षेप न घेता दुरुस्तीपत्राचा लेख नोंदणी करुन देतील.

सदर्हु वर्णनाची स्थावर मालमत्ता कोठे गहाण, बक्षिस, विक्री किवा दुसऱ्याला विकण्याचा करार केलेला नाही. तसेच कुणाच्याच चार्ज बोझात नाही. विक्री नंतर तुमच्या मालकी हक्काला बाधा येईल असे कोणतेही तत्य केलेले नाही. तसे काही निघाल्यास व त्यापासून आपले नुकसान झाल्यास त्याची भरपाई मी तुम्हाला करुन देऊ. तुम्हाला तोषीस खर्च लागू देणार नाही.

सदर्हु तुम्हाला विकलेल्या स्थावर मालमत्तेचा सर्व प्रकारचा कर दिला असून विक्रीनंतरचा कर देण्याची जबाबदारी विकत घेणाऱ्याची राहील याला उजर करणार नाही. वरील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचे आपण मालक झाले असून मालक म्हणून सरकारी निमसरकारी व इतर आवश्यक ठिकाणी नोंद करुन घ्यावी, गरज पडल्यास मी तुमच्या नावाची नोंद करुन देण्यास सम्मती आहे. याला उजर करणार नाही.

वरील वर्णनाची स्थावर मालमत्ता मी लिहून देणार यांनी दि. ............... ला .......... ........................ यांचे कडून विकत घेतली असून विक्रीपत्र नोंदणी क्रं. ...................... ....... हा आहे.

सदर्हु माझ्या शिवाय इतर नातलगांचा व वारसानांचा काहीच हक्क नाही तसे काही निघाल्यास व त्यापासून आपले नुकसान झाल्यास त्याची भरपाई आम्ही तुम्हाला करुन देऊ. ह्याला उजर राहणार नाही.

करीता विक्रीपत्राचा लेख लिहून दिलेला असून वाचून समजावून स्वखुशीने, शुध्दस्थितीत असतांना खालील साक्षदारा समक्ष दि...............२०२६ ला लिहून देणार व लिहून घेणार यांनी सहया/आंगठा केले आहेत. हा लेख लिहून घेणार व लिहून देणार ह्यांना व यांच्या इस्टेट वारसानास लागू राहील.

**साक्षीदार** **विक्रीपत्र लिहून देणारची सही**

**१) .........................**

**श्रीमती लक्ष्मी रामभाऊ वाघाड**

**२) ..........................**

**विक्रीपत्र लिहून घेणारची सही**

**श्री. भरत गुलाबराव चव्हाण**